| MHAU070008142025 | नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२५<br>शेकनाथ वि. हिरालाल |
|---|---|

<u>**निशाणी क्र. १९ खालील आदेश**</u>

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून त्यांचा लेखी जबाब दाखल करून घेण्याताबत अर्ज दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, काही महत्वाची कागदपत्रे मिळाली नसल्यामुळे व कौटुंबिक अडचणीमुळे लेखी जबाब मुदतीत दाखल करता आला नाही. त्यांनी मुद्दामहून विलंब केला नाही. प्रस्तुतचा दावा हा अचल संपत्तीकरीता दाखल केला असल्यामुळे प्रतिवादीचा देखील त्यामध्ये हक्क व अधिकार आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असून तो मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून अर्ज व त्यातील कथने नाकारलेली आहेत. त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी मुद्दामहून लेखी जबाब दाखल करण्यास विलंब लावलेला आहे. अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. अर्ज व त्यातील कथने वाचून पाहिली. वादीने प्रस्तुतचा दावा हा ताब्याकरीता व कायमस्वरूपी मनाईकरीता दाखल केला आहे. त्यामुळे एकंदरीत दाव्याचे स्वरूप पाहता व त्यातील कथनांचा विचार करता प्रतिवादी यांना योग्य बचाव घेण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. उलटपक्षी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरून येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. एकंदरीत झालेला विलंब पाहता व अर्जातील कारण पाहता तसेच वादींचे वकीलांचा तोंडी युक्तीवाद पाहता अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. तसेच प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाल होण्यास मदतच होणार आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये ४००/-(अक्षरी चारशे रुपये मात्र) च्या द्रव्यदंडावर मंजूर  करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावी.

३. द्रव्यदंडाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादीचा लेखी जबाब अभिलेखावर घेण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by ANIKET ARUN KALAMKAR
Date: 2026.02.27 17:38:31 +0530

दिनांक - २७/०२/२०२६

( ए. ए. कळमकर )
३ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, गंगापूर.